पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था संचलित

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्री

ता.फुलंब्री, जि. औरंगाबाद.

व

# मराठी अर्थशास्त्र परिषद

यांच्या संयुक्त विद्यमाने

स्व. जमनलाल बजाज उपक्रम

अहवाल

२०१६-२०१७

श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय, फुलंब्रीचा अर्थशास्त्र विभाग व मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या संयुक्त विद्यमाने स्व. जमनलाल बजाज उपक्रमांतर्गत दिनांक २ ऑक्टोबर २०१६ रोजी **महात्मा गांधी व पंडित दीनदयाळ यांची विकास निती** या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्रार्थनेने झाली. त्यानंतर प्रतिमा पुजन करण्यात आले. यावेळी परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. चारुदत्त गोखले, कार्यवाह खजिनदार डॉ. राजेंद्र भांडवलकर अर्थसंवादचे संपादक डॉ. अविनाश निकम, कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते श्री बाळासाहेब सराटे, कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव ठोंबरे यांचे स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रस्ताविक परिषदेचे कार्यवाह खजिनदार डॉ. राजेंद्र भाडवलकर यांनी केले. या वेळी त्यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद राबवीत असलेल्या विविध उपक्रमाची माहिती दिली.

**महत्मा गांधी व पंडित दीनदयाळ यांची विकास निती** या विषयावर बोलतांना प्रमुख वक्ते श्री बाळासाहेब सराटे म्हणाले की, महात्मा गांधी व पंडित दीनदयाळ या दोघांचे विचार भारतीय विचार धारेवर आधारलेले होते. विकास का माणूस केंद्री असावा. माणसाचा विकास करताना त्याच्या शरीर, मन, बुध्दी व आत्माचा विकास झाला पाहिजे. यंत्र, स्पर्धा, बाजार व उपभोग याचा अतिरेक माणसाच्या अस्तीत्वाला घातक असतो. जसे यंत्राचा अतीरेकी वापर माणसाला बेकार करतो. म्हणून या सर्वांच्या वापरावर नियंत्रण पाहिजे. असे दोन्ही विचारवंताचे मत होते.

कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना परिषदेचे माजी अध्यक्ष व पंडित दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे सचिव, डॉ. सर्जेराव ठोंबरे सर म्हणाले की, महत्मा गांधी व पंडित दीनदयाळ यांचे विचार प्रत्यक्ष आचरणात उतरवणे गरजेचे आहे. महात्मा गांधीच्या नावावर राजकीय सत्ता उपभोगणारे अनेक लोक आहेत. परंतु विचार प्रत्यक्ष आचरणात आणणारे अत्यल्प आहेत. महाविद्यालयास मराठी अर्थशास्त्र परिषदेने सदरील उपक्रम दिल्या बद्दल परिषदेचे आभारही त्यांनी मानले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. एस. आर. टकले, डॉ. ए. बी. देवगिरीकर(निवृत्त प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ) प्रो. डॉ. अशोक पवार (प्राध्यापक , अर्थशास्त्र विभाग), डॉ. गणेश गांवडे, डॉ. ए. डी. एरंडे, प्रा. ए. बी. पवार, डॉ. विजय सूर्वे, परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ.एस. डी. जोशी इत्यादी अर्थशास्त्र अभ्यासकांची उपस्थिती होती.

तसेच श्री अनिल सवंत्सर, श्री ज्ञानेश्वर थोरे, श्री आप्पासाहेब चव्हाण, ग्रामस्थांमध्ये श्री नरेंद्र देशमुख, श्री जनार्धन तुपे, श्री मगरे, श्री संजय त्रिभूवन, श्री संत सावता संकुलातील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे शिक्षक यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे संयोजक म्हणून महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. कल्याणकर पी. एम. यांनी काम केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. अश्विन रांजणीकर यांनी, प्रार्थना डॉ. मंजुषा नळगिरकर, सुविचार डॉ. रामकिसन लोमटे यांनी तर आभार अर्थसंवादचे संपादक डॉ. अविनाश निकम यांनी मानले. कार्यक्रमाच्या आजोजनासाठी प्रा. विजय पांडे, डॉ. राजश्री पवार, डॉ. रामकिशन लोमटे, डॉ. गणेश कुलकर्णी, डॉ. दत्तात्रय येडले, डॉ. सुरेश मुंढे, डॉ. संजय पांचाळ, डॉ. महेश थोरात, प्रा.नितीन माळेगावकर, श्री दयाराम कांबळे, श्री बाबासाहेब दाभाडे, श्री प्रेम चव्हाण व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाचे शेवट महात्मा गांधी यांच्या वैष्णव जन या गिताने झाला.

**डॉ. कल्याणकर पी. एम.**
विभाग प्रमुख अर्थशास्त्र विभाग,
श्री संत सावता माळी ग्रामीणमहाविद्यालय,
फुलंब्री ता. फुलंब्री जि. औरंगाबाद.

प्राचार्य
**डॉ. एस. आर. टकले.**
**प्राचार्य**
**श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय**
**फुलंब्री, जि. औरंगाबाद**

# स्व. जमनालाल बजाज उपक्रम
## फोटो अहवाल




दि. २ ऑक्टोबर २०१६ स्व. जमनालाल बजाज उपक्रमात प्रतिमा पुजन करताना प्रा.चारूदत्त गोखले, डॉ. अविनाश निकम, डॉ.सर्जेराव ठोंबरे




स्व. जमनालाल बजाज उपक्रमाच्या वेळी मान्यवरांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ. एस. आर. टकले



माजी अध्यक्ष डॉ. जोशी यांचे स्वागत करताना डॉ. संजीवकुमार पांचाळ




स्व. जमनालाल बजाज उपक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ.राजेंद्र भांडवलकर (कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद)




स्व. जमनालाल बजाज उपक्रमांतर्गत ''महात्मा गांधी व पं. दीनदयाळ यांची विकासनिती'' या विषयावर बोलताना प्रमुख वक्ते श्री बाळासाहेब सराटे






स्व. जमनालाल बजाज उपक्रमांतर्गत आयोजित व्याख्यान कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना डॉ.सर्जेराव ठोंबरे (सचिव, पंडित दीनदयाळ उपध्याय शिक्षण संस्था)




स्व. जमनालाल बजाज उपक्रमांतर्गत आयोजित व्याख्यान कार्यक्रमाचे आभार मानताना डॉ. अविनाश निकम (संपादक, अर्थसंवाद)




स्व. जमनालाल बजाज उपक्रमांतर्गत आयोजित व्याख्यान कार्यक्रमाचा शेवट ''वैष्णव जन ते .......।। या महात्मा गांधीच्या गीताने करण्यात आला.



# PUBLICITY

# म. गांधी व पंडित दीनदयाळ यांच्या विचारांवर चालले पाहिजे- बाळासाहेब सराटे

16




तालुका प्रतिनिधी / ७ ऑक्टोबर

**फुलंब्री :** म.गांधी म्हणजे परिपूर्ण जीवनाचा एकत्रित विचार होय. म. गांधी यांचे कोणतेही काम म्हणजे विकास नीतीचा परिपाठ. म. गांधी व पंडित दीनदयाळ यांच्या विचारांवर पाउल टाकूनच आपण चालले पाहिजे. कारण त्यांच्या प्रयोगात व वागण्यात सत्यता होती असे प्रलिपादन बाळासाहेब सराटे यांनी केले.

फुलंब्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयत व मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा गांधी जयंती निमित्त स्व.जमनालाल बजाज उपक्रम अर्थशास्त्र विभागाच्या वतीने घेण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून बाळासाहेब सराटे यांनी मार्गदर्शन केले.सराटे यांनी 'महात्मा गांधी व पंडित दीनदयाळ यांची विकास निती'' या विषयावर माहिती दिली. पुढे बोलताना ते म्हणाले की अर्थशास्त्र परिषद ही विविध सामाजिक उपक्रम राबविते तसेच विविध व्याख्यानमालांचे आयोजनही करते, त्याचबरोबर उत्तम लेखनाबाबतचे पुरस्कारही देण्याचे कामही मराठी अर्थशास्त्र परिषद करते.म.गांधी यांनी मनुष्यकेंद्री विकासाला महत्त्व दिलेले आहे. देशातल्या सर्व लोकांच्या गरजा भागल्या पाहिजेत असा विचार म. गांधी व पंडित दीनदयाळ यांनी केलेला दिसतो.अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ.सर्जेराव ठोंबरे हे तर डॉ.अविनाश निकम (संपादक, अर्थसंवाद), मराठी अर्थशास्त्र परिषदेचे कार्यवाह डॉ.राजेंद्र भांडवलकर, प्रा.चारुदत्त गोखले, मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष, डॉ. शिवाजी भोसले प्रमुख उपस्थिती यांची होती. प्रास्ताविक डॉ.राजेंद्र भांडवलकर यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ.एस.आर. टकले,संवत्सर, डॉ.देवगिरीकर, डॉ.गणेश गावंडे, डॉ.अशोक पवार, डॉ.विजय सुर्वे, डॉ.एरंडे, डॉ.ए.बी. पवार, नरेंद्र देशमुख, श्रीराम जोशी आदिंची उपस्थित होते. सुत्रसंचलन डॉ.अश्विन रांजणीकर यांनी केले तर आभार डॉ.अविनाश निकम यांनी मानले. याप्रसंगी प्राध्यापक व प्रध्यापकेत्तर सर्व कर्मचारी उपस्थित होते.

देशोन्नती - दिनांक - 8 आक्टोबर 2016